## वारकरी साहित्य परिषदेचा वर्धापन दिन

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**मूल, दि. ५ ऑगस्ट :** वारकरी साहित्य परिषद महाराष्ट्र या संस्थेचा १४ वा वर्धापन दिन ११ ऑगस्ट रोजी आहे. या वर्धापन दिनानिमित्त राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये संत मुक्ताई, जनाई, बहिणाबाई हरिपाठ मंडळांच्या हरिपाठ स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले आहे. या निमित्ताने त्याच्या नियोजनाची बैठक आज चंद्रपूर येथे दि.०२ ऑगस्ट रोजी संपन्न झाली.वारकरी साहित्य परिषदेच्या वर्धापन दिनानिमित्त हरिपाठ स्पर्धांचे जे आयोजन करण्याचे ठरले आहे. हरिपाठ स्पर्धेमध्ये भाग घेणाऱ्या महिला हरिपाठ मंडळांना अनुक्रमे एक ते पाच नंबर देण्यात येणार आहेत.

## कोरपना तहसील कार्यालयात महसुल दिन

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**कोरपना, दि. ५ ऑगस्ट :** १ ऑगस्ट २०२५ रोजी महसूल दिन निमित्ताने तहसील कार्यालयात विविध उपक्रमांचे आयोजन करून हा दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमास तहसीलदार पल्लवी आखरे मॅडम, नायब तहसीलदार वासेकर मॅडम, भगत साहेब, पुरवठा निरीक्षक देवघरे, आरोग्य अधिकारी, मंडळ अधिकारी, महसूल सहायक अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, महसूल सेवक तसेच पोलीस पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त दीपप्रज्वलनाने करण्यात आली.

# लालपरीचा अपघात एकाचा मृत्यू १८ प्रवासी जखमी

### चारगांव (बु) पुलाजवळील घटना

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**चिमूर, दि. ५ ऑगस्ट :** चिमूर- वरोरा राष्ट्रीय महामार्ग ३५३( ई) वर चारगांव ( बु) जवळील नदीच्या पुलाजवळ चिमूर आगाराची चिमूर - चंद्रपूरला प्रवाशी घेऊन जाणारी बस क्रमांक एम एच ४०, क्यु ६१८१ चालकाचे नियंत्रण सुटल्याने १० फुट खोल खड्ड्यात गेल्याने भिषण अपघात होऊन वाहकाचा मृत्यू झाला तर १८ प्रवाशी जखमी झाल्याची घटना आज दि. ५ ऑगस्ट रोजी दुपारी अंदाजे २-३० वाजताचे सुमारास घडली.





प्राप्त माहीती नुसार आज दुपारी अंदाजे २:३० वाजताचे सुमारास चिमूर ते चंद्रपूरला २० - २५ प्रवाशी घेऊन जाणारी बस चारगांव ( बु) जवळील नदीच्या पुलाजवळ चालकाचे नियंत्रण सूटल्याने १० फुट खोल खड्ड्यात गेल्याने भिषण अपघात झाला. यात बसमध्ये असलेले १९ प्रवाशी जखमी झाले. जखमींना परिसरातील नागरिकांनी उपचाराकरीता वरोरा उपजिल्हा रूग्णालयात नेत असतांना वाहक सुरेश भटाळकर यांचा वाटेतच मृत्यू झाला तर १८ जखमी प्रवाशांना वरोरा उपजिल्हा रूग्णालयात दाखल केले असता ६ प्रवाशी गंभीर जखमी असल्याने त्यांना जिल्हा रूग्णालय चंद्रपूर येथे पाठविण्यात आलेले आहे. बस चालक सुरज पुसनाके यांचे फिर्यादी वरून शेगांव पोलीस घटना स्थळी दाखल होऊन घटना स्थळ पंचनामा करून बस चालकावर गुन्हा नोंद करून पुढील तपास करित आहेत. दरम्यान घटना स्थळी चिमूर व वरोरा आगाराचे अधिकारी पोहचले होते. परिसरातील नागरिकांनी मोठ्या पमाणात गर्दी करून जखमींना उपचाराकरिता अनेक वाहणांनी पाठविण्याकरिता सहकार्य केले.

# श्री महर्षी विद्या मंदिर, चंद्रपूरची चैतन्या राऊत हिला झोनल बॉक्सिंग स्पर्धेत रौप्य पदक

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ५ ऑगस्ट ;** भंडारा जिल्ह्यातील लाखनी येथे पार पडलेल्या CBSE झोनल लेव्हल बॉक्सिंग स्पर्धेत श्री महर्षी विद्या मंदिर, चंद्रपूर विद्यालयातील विद्यार्थी चैतन्या राजेश राऊत हिने उल्लेखनीय कामगिरी करत रौप्य पदक (सिल्व्हर मेडल) पटकावले आहे. ही स्पर्धा CBSEबोर्ड अंतर्गत झोनल स्तरावर एमडीएन फ्युचर स्कूल लाखनी भंडारा येथे दिनांक २६ जुलै ते २९ जुलै २०२५ ला घेण्यात आली होती, ज्यामध्ये महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील शाळांनी सहभाग घेतला होता.

चैतन्याने U-१७ वयोगटात ६०-६३ वजनगटात दमदार खेळ करत प्रतिस्पर्ध्यांना पराभूत केले आणि अंतिम फेरीत प्रवेश केला. अत्यंत अटीतटीच्या अंतिम सामन्यात तिला थोडक्याच फरकाने सातारा जिल्ह्यातील खेळाडू बरोबर सामना खेळताना पराभव पत्करावा लागला, मात्र तिच्या चपळ हालचाली, मजबूत पंच आणि खेळातील आत्मविश्वास यामुळे तिने उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली. स्पर्धा संपल्यानंतर चैतन्या जेव्हा शाळेत परतली, तेव्हा तिचे स्वागत अत्यंत उत्साहात करण्यात आले. शाळेच्या प्राचार्या श्रीलक्ष्मी मूर्ती यांनी आपल्या भाषणात चैतन्याच्या यशाचे कौतुक करीत सांगितले, 'चैतन्या ही अतिशय मेहनती, शिस्तप्रिय आणि क्रीडाप्रेमी विद्यार्थी आहे. तिचा हा संघर्ष आणि जिद्द चैतन्याला रोहतक हरियाणा येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्तरावर पोहोचवले आहे,तिथे देखील चैतन्या पूर्ण जिद्द व चिकाटीने सहभाग घेईल हे आम्हाला पूर्ण विश्वास आहे हे अभिमानाने शाळेच्या प्राचार्या ने सांगितले आहे.'तसेच तिचे टाळ्यांच्या गजरात स्वागत केले.उपप्राचार्या निशा मेहता यांनी देखील तिच्या प्रशिक्षकांचे आणि पालकांचे आभार मानले.

# महाकाली कॉलरी परिसरात मोहा दारु विकणाऱ्या महिलांवर कारवाई

### चंद्रपूर शहर पोलिसांची धाड

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ५ ऑगस्ट ;**पोलीस स्टेशन, चंद्रपूर शहर येथे दिनांक ५ ऑगस्ट रोजी डि.बी. पथक अधिकारी व पो स्टॉफयह पो. स्टे. परिसरात बॉश ऑकट मोहीम दरम्यान पेट्रोलींग करित असता महाकाली कॉलरी आनंदनगर चंद्रपूर येथे काठी घरामध्ये मोहा सडवा, मोहा दारू, देशी दारू बाळगुन विक्री करीत असल्याचे आढळले.

पोलीस निरीक्षक निशीकांत रामटेके यांचे मार्गदर्शनात पी. स्टॉफ, पंच, वजन मापधारक, फोटोग्राफर सह असे घटनास्थळी कारवाई करणे करीता पोहचले असता, काही महीला त्यांचे स्वतःचे राहते घरी मोहा सडवा, मोहा दारू, देशी दारू मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेउन घरझडती घेतली असता, आरोपी लक्ष्मी अशोक दहागावकर वय ४६ वर्ष, कांता



प्रकाश सापडे वय ५६ वर्ष, छाया शंकर दुर्गेग ५० वर्षे, तुळशी दिपक मेश्राम वय ३७, शशीकला त्रिमोहन बुटले वय ४१ वर्ष, श्रीमती माया लक्ष्मण दुर्गे वय ५८ वर्ष, मोनिका विजय दुर्गे वय ३६ वर्ष, सुशिल् मुरलीबर ठाकरे वय ६० वर्ष सर्व रा. आनंदनगर महाकाली कॉलरी चंद्रपूर सदर नमुद आरोपीकडुन वॉश ऑउट मोहीम दरम्यान मोहा दारू ४८५ लीटर प्रत्ती लौटा ७० रूपये प्रमाणे किंमत ३३,९५० रूपये या माल जप्त करण्यात आला. मोहा सड़वा १२८० लीटर प्रती लीटर ५० रूपये प्रमाणे किंमत ६४,००० रूपये चा माल जप्त करण्यात आला. मोहा दारू काढण्याकरीता वापरण्यात आलेले ईतर साहित्य किंमत ४२,१५० रूपयेचा मुद्देमाल माल जपा करण्यात आला एकूण ३४ मग ९० एम.एल नी भरलेल्या देशी दारूच्या प्लास्टीक शिश्या प्रत्येकी ४० रूपये प्रमाणे किंमत १३६० परी अया एकूण १४१,४६० रूपये था माल मिळुन आला. सदर कार्यवाही पो. नि. निशीकांत रामटेके यांचे नेतृत्वात सपोनि राजेंद्र सोनवणे, सपोनि नन्नावरे, पोउपनि दत्तात्रय कोलते, विलास निकोडे, परि पौउपनि, मनिष तालेवार, वैभव चव्हाण, भावना रामटेके, सचिन बोरकर, लक्ष्मण रामटेके, संजय धोटे, ईमरान शेख, निकेश हेंगे, जावेद सिष्ट्रीकी, मल्लेश नरवार, प्रविण रामटेके कपुरबंद खरवार, योगेश पिदुरकर, निलेश डोक, विक्रम मेश्राम, रूपेश पराते, सारीका गौरकार, दिपीका झिंगरे यांनी केली.

# परभणीच्या पालकमंत्र्याच्या वक्तव्याचा पोंभूर्णा ग्रामपंचायत अधिकाऱ्यांद्वारे काळ्या फिती लावून निषेध



### ७ आगस्टला मुख्यालयी न राहण्याचेही दिले निवेदन

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**पोंभूर्णा, दि. ५ ऑगस्ट :** परभणी जिल्ह्यातील बोरी येथील घरकुल वाटपाच्या कार्यक्रमात पालकमंत्री मेघना बोर्डीकर-साकोरे यांनी ग्रामसेवकाच्या कानाखाली लावेल असे जाहीर वक्तव्य केले. या वक्तव्याच्या निषेधार्थ सोमवार ४ ऑगस्टला पोंभूर्णा तालुक्यातील ग्रामसेवकांनी काळ्या फिती लावून पोंभूर्णा गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन देत घटनेबद्दल निषेध नोंदवला.व ७ ऑगस्टला चंद्रपूर येथे होणाऱ्या मुक मोर्चात होत असल्याने

परभणी जिल्ह्यातील बोरी येथील घरकुल वाटपाच्या कार्यक्रमात पालकमंत्री मेघना बोर्डीकर-साकोरे यांनी ग्रामसेवकाच्या कानाखाली लावेल असे जाहीर वक्तव्य केले हे अत्यंत खेदजनक असल्याने राज्यातील ग्रामसेवकांनी निषेध नोंदवत आहेत.या वक्तव्याच्या निषेधार्थ सोमवार ४ ऑगस्टला पोंभूर्णा तालुक्यातील ग्रामसेवकांनी काळ्या फिती लावून पोंभूर्णा गटविकास अधिकारी नमिता बांगर यांना निवेदन देत घटनेचा निषेध नोंदवला व दि. ७ ऑगस्ट रोजी जिल्हा परिषद कार्यालय येथून सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयावर मूक मोर्चा काढण्याचे जाहीर केले आहे. या मोर्चा मध्ये घोषणाबाजी न करता शांततेत मोर्चा काढला जाणार असल्याचेही महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियन संघटनेच्या पोंभूर्णा तालूका शाखेच्या वतीने जाहीर केले असून दि.७ आगस्टला पोंभूर्णा तालुक्यातील ग्रामपंचायत अधिकारी मुख्यालयी उपस्थित राहणार नसल्याचेही निवेदनात म्हटले आहे.

यावेळी संघटनेचे तालुका अध्यक्ष प्रविण कडूकर,संतोष परसुटकर,सुभाष तेलमासरे,दिलीप शिंदे,हरिदास भसारकर, ताराचंद शेंडे,प्रमोद तिमांडे,सुरेखा मडावी,खुशाब मानपल्लीवार,मनोज मुडावार, प्रमोद सरकार,सचिन आदे,आकनुरवार यांची उपस्थिती होती.

# आगामी स्थानिक निवडणुका वंचित बहुजन आघाडी जोमाने लढणार - शुभम मंडपे

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**चिमूर, दि. ५ ऑगस्ट :** स्थानिक निवडणुकीचे वारे वाहू लागले असतांना वंचित बहुजन आघाडीची चिमूर विधानसभा आढावा बैठक संपन्न झाली.

वंचित बहुजन आघाडी चिमुर, नागभीड व ब्रम्हपुरी नगरपरिषद निवडणुका जोमाने लढणार असल्याची माहिती वंचित बहुजन युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष शुभम मंडपे यांनी दिली.

यावेळी सर्व जिल्हा परिषद सेक्टर प्रमुख व पंचायत समिती सेक्टर प्रमुख व सर्व बूथ अध्यक्ष पदाधिकारी उपस्थित होते.



आढावा बैठकीत अनेक ठरावही मंजूर करण्यात आले . सर्व जिल्हा परिषद क्षेत्रामध्ये कार्यकर्ता मेळावे घेण्यात यावे, सोमनाथ सूर्यवंशी यांना ॲड बाळासाहेब आंबेडकरांनी न्यायालयीन लढाई लढून न्याय दिला त्याबद्दल जनजागृती करणे , महाबोधी महाविहार मुक्ती अंदोलन जनजागृती करणे व इतर ठराव घेण्यात आले .

यावेळी आढावा बैठकीला अध्यक्ष म्हणून महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा कविता गौरकर, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून युवा जिल्हाध्यक्ष शुभम मंडपे, जिल्हा सल्लागार एन. आर.कांबळे , तालुका अध्यक्ष डाँ बाळासाहेब बन्सोड, महासचिव लाला मेश्राम, शहर अध्यक्ष थुल , युवा चिमुर अध्यक्ष रवी शेंडे, मनोज राऊत, आकाश भगत, राजु घोनमोडे, जनार्धन खोब्रागडे गोपी घुटके, कैलास वाघमारे,अरुण मेश्राम व अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

# रणरागिनी फाउंडेशनच्या वतीने सावन मेल्याचे आयोजन

**महासागर प्रतिनिधी**

**बल्लारपूर, दि. ५ ऑगस्ट :** शहरातील प्रतिष्ठित सामाजिक सेवा संस्था रणरागिनी हिरकणी फाउंडेशनने २ ऑगस्ट रोजी संत तुकाराम हॉल येथे भव्य 'सावन मेळा' आयोजित केला होता. या कार्यक्रमात शहरातील २०० हून अधिक महिलांनी उत्साहाने सहभाग घेतला. कार्यक्रमात सावन क्वीन, जुळी जोडी, ग्रुप डान्स तसेच मनोरंजक खेळ अशा विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. ग्रुप डान्समध्ये नटराज ग्रुपला प्रथम क्रमांक, बीएचआर ग्रुपला द्वितीय क्रमांक आणि पंजाब क्वीन्सला तृतीय क्रमांक मिळाला. सावन क्वीन स्पर्धेत सुश्री तेजस येगिनवार प्रथम क्रमांक, प्रीती कथोड द्वितीय क्रमांक आणि नॅन्सी छाब्रा तृतीय क्रमांकावर राहिली. जुळी जोडी स्पर्धेत नम्रता आणि पूजा मालू विजेत्या ठरल्या, तर पूनम आणि सुनीता काब्रा यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. या कार्यक्रमात बंपर लकी ड्रॉसह अनेक मनोरंजक उपक्रमांचा समावेश होता, ज्यामध्ये महिलांनी मोठ्या संख्येने भाग घेतला आणि कार्यक्रमाचा पुरेपूर आनंद घेतला. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या संध्या ग्वालपंची होत्या आणि



प्रमुख वत्त्या म्हणून सोनाली उपासे आणि राजश्री मार्कंडेवार यांनी आपले विचार व्यक्त केले. गुंजन अमर आणि गोजिरी फुलझेले यांनी परीक्षकांची भूमिका बजावली. या यशस्वी कार्यक्रमाच्या प्रकल्प संचालक होत्या - रेणुका कडेल, दीक्षा भट्ट आणि डॉ. मोनिषा पाटणकर. संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा स्नेहा भाटिया, विद्यमान अध्यक्षा डॉ. सपना जैन, सचिव अनुराधा जोशी आणि माजी अध्यक्षा संजना मूलचंदानी यांच्यासह सदस्या स्मिता चानप, कोमल पोपली, गीता यमसिनवार, संतोषी बोडेंकी, वर्षा दवणे, पूजा पंजवानी आणि रुपिंदर दरी यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाची शोभा वाढवली.

# पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण विभाग चंद्रपूर येथे वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ५ ऑगस्ट :** पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण उपविभाग क्र. २ चंद्रपूर तसेच पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण उपविभाग आलापल्ली मु.चंद्रपूर यांचे संयुक्त विद्यमाने कार्यालय परिसरात वृक्ष लागवडीचा कार्यक्रम दि.३१ जुलैला पार पडला. वृक्षारोपण कार्यक्रमाची सुरवात कार्यकारी अभियंता रविंद्र वऱ्हाडे व उपकार्यकारी अभियंता योगेश जामकर यांचे हस्ते करण्यात आली.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी वृक्षाचे महत्त्व विशद केले. या कार्यक्रमासाठी विदर्भ पाटबंधारे कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे पालक संचालक तथा वरिष्ट लिपिक गणेश गेडेकर ,प्रथम लिपिक अंजली वैरागडे, सहा.अभियंता पूनम जीवतोडे , लीना कन्नाके, विभागीय भांडारपाल अरुणा कोंडेकर, प्रकाश वानखेडे, सिद्धेश्वर दंडिकवार, रेशमा राठोड, अन्सार हुसेन तसेच विभागातील अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती होती.



# ९ ऑगस्ट रोजी संविधान चौकात विराआंसची निदर्शने

### विराआंसे अध्यक्ष ॲड. चटप यांची पत्रकार परिषदेत माहिती

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ५ ऑगस्ट ;**विदर्भ राज्य आंदोलन समिति ने देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातील घटनांवर आधारित क्रांती दिनानिमित्त शनिवारी ९ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी १२ ते ४ वाजेपर्यंत नागपूरच्या संविधान चौकात महाराष्ट्र चले जाओ आणि विदर्भ विरोध या स्वरूपात निदर्शने आंदोलनाचे आयोजन केले असल्याची माहिती विदर्भ राज्य आंदोलन समिती चे अध्यक्ष एड. वामनराव चटप यांनी पत्रकार परिषदेत दिली. त्यांनी सांगितले की, संविधानाच्या कलम ३ नुसार केंद्र सरकारने तात्काळ 'स्वतंत्र विदर्भ राज्य' निर्माण करावे. या उद्देशाने आंदोलन तीव्र करण्याच्या उद्देशाने 'महाराष्ट्र चलो जाओ आणि विदर्भ विरोध' आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे. ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत राज्य सरकारवरील कर्जाचा डोंगर आणि व्याजाचा बोझ एकूण ९,८३,७८७ कोटी रुपये असेल. त्यामुळे, महाराष्ट्र सरकार ६० हजार कोटी सिंचनाचा अनुशेष आणि सार्वजनिक आरोग्य, शिक्षण, उद्योग, ऊर्जा, रस्ते, पेयजल, ग्रामीण



विकास, आदिवासी विकास आणि सामाजिक न्याय विभागांचा १५,००० कोटी रुपयांचा अनुशेष असा एकूण ७५ हजार कोटी रूपयाचा निधि देऊन विदर्भाचा अनुशेष भरून काढण्यास असमर्थ आहे. राज्याची वाटचाल दिवाळखोरीकडे जात आहे. तो अनुशेष कधीही भरून निघणार नाही. शेतकरी आत्महत्या आणि कुपोषण, माता आणि बालमृत्यूचे परिणाम कमी करता येणार नाहीत. प्रदूषण दिवसेंदिवस वाढत आहे.


## जाहिर प्रकटन

मी नामे **सौ. तुलना राजेश्वर विधाते** पेठ वार्ड रुख्मीनीनगर ब्रम्हपुरी ता. ब्रम्हपुरी येथील रहिवासी असून माझे जन्म गाव मौजा पारडगांव ता. ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर येथील आहे. माझे लग्ना पूर्वीचे नाव **कु. तुलना श्रीराम तोंडरे** असून माझे प्राथमिक शिक्षण वर्ग १ ले ७ पर्यंत जि. प. पूर्व माध्यमिक विद्यालय पारडगांव येथे झाले आहे. शालेय रेकार्डनुसार माझी **जन्म तारीख २०.०९.१९६३** आहे. उपरोक्त माहिती खोटी आढळल्यास मी स्वतः जबाबदार राहिन. याबाबत कुणाचा आक्षेप असल्यास ७ दिवसाच्या आत मा. उपविभागीय अधिकारी ब्रम्हपुरी यांचेकडे नोंदवावा.

**आपली नम्र**

**सौ. तुलना राजेश्वर विधाते**


# जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत घोडपेठ येथे महसूल सप्ताहाचे उद्‌घाटन

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**भद्रावती, दि. ५ ऑगस्ट :** तहसील कार्यालय भद्रावती येथील घोडपेठ मंडळामध्ये महसूल सप्ताह २०२५ अंतर्गत श्री छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाचे घोडपेठ येथील शेतकरी भवनात सोमवारी मोठ्या उत्साहात उद्‌घाटन करण्यात आले.

सदर कार्यक्रमाचे उद्‌घाटन जिल्हाधिकारी नितीन व्यवहारे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी तहसीलदार राजेश भांडारकर, सरपंच अनिल खडके, नायब तहसीलदार सुधीर खांडरे, मनोज आकनूरवार, मंडळ



अधिकारी जयश्री गणपुरवार, ग्राम महसूल अधिकारी विनोद चिकटे, दिनेश भिसिकर, अनिल गहुकर, गिरीश कोहळे, अनामिका भगत, अरविंद कोल्हटकर तसेच महसूल सेवक संदिप रामटेके,

प्रकाश दुपारे, वसीम शेख, रणजित डोंगे, घोडपेठ ग्रामविकास अधिकारी चंद्रशेखर नगराळे, प्राथमिक आरोग्य केंद्र घोडपेठचे डॉ. काकडे, कृषी पर्यवेक्षक मुक्ता ताजने, पोलिस पाटील व मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

या शिबिरामध्ये विविध दाखले वाटप करण्यात आले, तसेच जिवंत ७/१२ मोहिमेअंतर्गत शेतकऱ्यांना सातबारा उतारे देण्यात आले. आरोग्य विभागाकडून विविध आरोग्य तपासण्या करण्यात आल्या. राशन कार्ड, संजय गांधी निराधार योजना, मतदार नोंदणी, शेतकरी ओळखपत्र व ई-पिक पाहणी यासंबंधी मार्गदर्शन करण्यात आले. आधार नोंदणी व दुरुस्ती करिता सेतू सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. याशिवाय विविध बँकांच्या योजनांची माहिती देण्यात आली.

## आखीव पत्रिका वितरण व संजय गांधी निराधार योजना शिबिराचे आयोजन

**पोंभूर्णा, दि. ५ ऑगस्ट :-** महसूल सप्ताह अंतर्गत महसूल विभागाच्या वतीने दि.५ ऑगस्ट ला सकाळी १०:३० वाजता, तहसिल कार्यालय, पोंभूर्णा येथे आखीव लाभार्थ्यांसाठी आखीव पत्रिका वितरण कार्यक्रम व संजय गांधी निराधार योजना शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिरात लाभार्थ्यांच्या नावावर जमीन व त्यावरील मालकी हक्क स्पष्ट करणारा अधिकृत दस्तऐवज आखीव पत्रिका वाटप करण्यात येणार आहे.संजय गांधी निराधार योजनेतील डीबीटी अनुदान न मिळालेल्या लाभार्थ्यांची नोंदणी केली जाणार आहे.


महानिर्मिती

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## भु. औ. वि. कें.

ई–निविदा सूचना क्र. ८४/२०२५–२६

भुसावळ औष्णिक विद्युत केंद्राकडून खालील पुरवठा / कामांसाठी ऑनलाईन निविदा मागविल्या जात आहेत.

| अनु. क्र. | निविदा क्र. / विभाग | निविदा तपशील | निविदेची अंदाजित किंमत / बयाना रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| १ | ३००००६०३०४<br>कोळसा हाताळणी विभाग ६६० मे. वॅ. | भु.औ.वि.केंद्र दीपनगर येथील ६६० मेगावॅट क्षमतेच्या कोळसा हाताळणी प्रकल्पातील दुय्यम क्रशर हाऊसमध्ये धूळ संग्राहक बसवणे आणि चालू करण्याचे रकाम. | रु.२,१६,००,०००/–<br>रु.२,१९,५००/– |
| २ | ३००००६०३०७<br>कोळसा हाताळणी विभाग ६६० मे. वॅ. | भु.औ.वि.केंद्र दीपनगर येथे कोळसा हाताळणी विभाग ६६० मेगावॅट क्षमतेच्या कोळसा हस्तांतरण चुट्ससाठी कोळसा प्रवाह नियंत्रित/डी–ब्लॉकिंग सिस्टमची स्थापना आणि कार्यान्वित करण्याचे काम. | रु.१,७९,५६,४००/–<br>रु.१,८३,१००/ |
| ३ | ३००००६०५११६<br>चक्रसंधारण विभाग २X५०० मे. वॅ. | भु.औ.वि.केंद्र दीपनगर येथे युनिट ४ आणि ५ २x५०० मेगावॅट साठी टर्बाइन इनडोअर ऑक्झिलरीजमध्ये नियमित (दैनंदिन) देखभाल कामासाठी द्विवार्षिक कामचा करार. | रु.१,०६,९९,७८२/–<br>रु.१,१०,५००/– |
| ४ | ३००००६०६११<br>सुरक्षा विभाग | भु.औ.वि.केंद्र दीपनगर च्या राख हाताळणी संयंत्र युनिट ४ आणि ५ च्या विविध सहाय्यक ठिकाणी सेफगार्ड/छत प्रदान करण्याचे आणि निश्चित करण्याचे काम. | रु.६८,८५,०००/–<br>रु.७२,४००/– |
| ५ | ३००००६०४८६<br>सेवा (ऑपरेशन सर्व्हिसेस) विभाग २X५०० मे. वॅ. | भु.औ.वि.केंद्र दीपनगर येथे २x५०० मेगावॅट संपूर्ण तेल हाताळणी संयंत्र GEHO पंप क्षेत्र, राख सायलो युटिलिटी हाऊस आणि त्याच्या लगतच्या बाहरील जागेसाठी द्विवार्षिक कामाचा करार. | रु.५८,४१,५२७/–<br>रु.६१,९००/– |
| ६ | ३००००६०५८८<br>सुरक्षा विभाग | भु.औ.वि.केंद्र दीपनगर येथे कर्मचाऱ्यांसाठी अग्निशामक सूटचा पुरवठा. | रु.३३,४८,०००/–<br>रु.३७,०००/– |
| ७ | ३००००६०५६२<br>विद्युत परिरक्षण व चाचणी विभाग २x५०० मे. वॅ. | भु.औ.वि.केंद्र दीपनगर येथील ५०० मेगावॅट क्षमतेच्या युनिट–०४ आणि ०५ च्या एव्हिएशन लाइटिंगचा पुरवठा, उभारणी आणि कार्यान्वित करणे. | रु.२७,७२,९३०/–<br>रु.३१,२००/– |

निविदा खर्च १ ,१८०/ - (जीएसटी सहित) आहे. अधिक माहितीसाठी कृपया भेट द्या. https://eprocurement.mahagenco.in/.

मुख्य अभियंता (सं.आणि सु.),
भु. औ. वि. कें., दीपनगर.

# चंद्रपूर महासागर



## चांदा पब्लीक स्कूलच्या विद्यार्थ्यांचे सुयश

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ५ ऑगस्ट :** चांदा पब्लिक स्कूलच्या विद्यार्थी पुन्हा एकदा आपली गुणवत्ता सिद्ध करत पुन्हा एकदा यशाच्या शिखरावर पोहचले आहेत. नुकत्याच पार पडलेल्या 'लॉजिक्विड्स मेंटल एप्टीट्यूड ऑलिंपियाड' २०२४.-२५ च्या दुस-या स्तरात विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत शाळेचे नाव उंचावले आहे.लॉजिक्विड्स हा एक नाविन्यपूर्ण उपक्रम आहे जो आय.आय.टी. बॉम्बेच्या टेक फेस्टशी संलग्न असून के.जी. ते ९वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांमध्ये तर्कशक्ती, बुद्धीमत्ता, समस्या सोडविण्याची क्षमता, विकसित करण्यावर भर देतो.

## नागभीड तालुक्यात अभिनव उपक्रमाचे आयोजन

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ५ ऑगस्ट :** राज्य शासनाच्या निर्देशाप्रमाणे १ ऑगस्ट रोजी महसूल दिन तर १ ते ७ ऑगस्ट २०२५ या कालावधीत महसूल सप्ताह साजरा करण्यात येणार आहे. या सप्ताहात नागभीड तालुका प्रशासनातर्फे अभिनव उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवारी आमदार कीर्तिकुमार ऊर्फ बंटी भांगडीया यांच्या हस्ते महसूल सप्ताहाचा शुभारंभ करण्यात आला.नागभीड तहसील कार्यालयाच्या प्रांगणात आयोजित या कार्यक्रमाला ब्रम्हपुरीच्या उपविभागीय अधिकारी पर्वणी पाटील, तहसीलदार प्रताप वाघमारे, उपविभागीय पोलीस अधिकारी, गट विकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी उपस्थित होते

# आ. सुधीर मुनगंटीवार यांचा धान उत्पादक शेतकऱ्यांसाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा यशस्वी

### दुसऱ्या टप्प्यातील १३४ कोटींचा धान बोनस चंद्रपूरच्या पणन अधिकारी कार्यालयाकडे प्राप्त धान उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यात दुसऱ्या टप्प्यातील बोनस लवकरच जमा होणार

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ५ ऑगस्ट :** शेतकरी हितासाठी सदैव सक्रिय असलेले राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तथा आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांना पुन्हा एकदा मोठे यश मिळाले आहे. धान उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यात दुसऱ्या टप्प्यातील बोनस रक्कम लवकरच जमा होणार आहे. यापूर्वी शासनाकडून प्राप्त झालेली पहिल्या टप्प्यातील ६९ कोटी रुपयांची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाली असून, आता १३४ कोटी २ लक्ष ५४ हजार ६३६ रुपयांची रक्कम चंद्रपूर जिल्ह्याच्या पणन अधिकारी विभागाकडे जमा झाली आहे. ही रक्कम लवकरच शेतकऱ्यांच्या थेट बँक खात्यात वर्ग करण्यात येणार आहे.



खरीप हंगाम २०२४-२५ अंतर्गत किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेत सहभागी झालेल्या नोंदणीकृत शेतकऱ्यांना प्रती हेक्टर २० हजार रुपयांचा बोनस मिळावा, अशी मागणी आमदार मुनगंटीवार यांनी विधानसभेत व मुख्यमंत्र्यांसमोर सातत्याने लावून धरली होती. 'वर्षा' निवासस्थानी मुख्यमंत्र्यांसोबत झालेल्या चर्चेनंतर शासनाने निर्णय घेत अन्न व नागरी पुरवठा विभागाने २५ मार्च रोजी अधिकृत शासन निर्णय जाहीर केला होता.

विशेष बाब म्हणजे शेतकऱ्यांनी धान विक्री केली नसेल तरीही नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांना दोन हेक्टरच्या मर्यादेत ही प्रोत्साहनपर रक्कम देण्यात येणार आहे, असा ठोस निर्णयही आ. मुनगंटीवार यांच्या मागणीवरून घेण्यात आला होता.

या निर्णयामुळे जिल्ह्याच नव्हे, तर राज्यभरातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

शेतकऱ्यांच्या हक्कासाठी सातत्याने पाठपुरावा करणारे आणि सभागृहात शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी लढणारे आमदार मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांतून याआधीही चंद्रपूर जिल्ह्यातील २०२ कोटी रुपयांची पीक विमा रक्कम आणि बोनस रक्कम शेतकऱ्यांच्या मिळाली आहे.

त्यांच्या संवेदनशील नेतृत्वाची ही सातत्यपूर्ण फलश्रुती शेतकरी हितासाठी निर्णायक ठरली आहे.

शेतकऱ्यांच्या खात्यात लवकरच बोनस जमा होणार असून, या निर्णयाबद्दल चंद्रपूर जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांनी आमदार सुधीर मुनगंटीवार यांचे विशेष आभार मानले आहेत.

# ग्रा.पं. च्या ग्रामनिधीमध्ये लोकप्रतिनिधींचा वाढता हस्तक्षेप

### ग्रामीण पातळीवर विकासकामांना अडथळा , पत्रपरीषदेत स्वराज्य सरपंच सेवा संघटनेचे सरपंच कामडी यांचा आरोप

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ५ ऑगस्ट :** ग्रामीण भागात सरपंचाची भूमिका महत्त्वाची आहे. गावाच्या विकासासाठी, कल्याणासाठी आणि सुशासनासाठी ते जबाबदार असतात. गावाच्या विकास आणि सरकारी योजना राबविण्यास मदत करतात. केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजना गावात राबविण्यात त्यांची महत्त्वाची भूमिका असते. ग्रापं ला मिळणाऱ्यां निधीचे व्यवस्थापन करत विकासासाठी त्यांचा वापर करतात. परंतु ग्रापं च्या कामात लोकप्रतिनिधींच्या वाढत्या हस्तक्षेपामुळे गावाचा विकास दूर होत असल्याचा आरोप स्वराज्य सरपंच सेवा संघटनेचे सदस्य सरपंच भोजराज कामडी यांनी



पत्रकार परिषदेत केला आहे.

ग्रामीण रोजगार हमी योजना ही गावाच्या विकासासाठी एक योजना आहे. या योजनेअंतर्गत बेरोजगारांना रोजगार देऊन ६०-४० च्या प्रमाणात संतुलन निर्माण केले जाते. परंतु, या कामांमध्ये परिसरातील आमदारांच्या हस्तक्षेपामुळे ९५/५ अंतर्गत आमदारांच्या मर्जीतले गावांचा आणि त्यांच्या खास लोकांना कंत्राटे देऊन विकास कामे केली जात आहेत. यामध्ये सरपंचांना बाजूला केले जात आहे. त्यामुळे गावात विकासा मध्ये स्पर्धा दिसून येत आहे. यापूर्वी मोठ्या प्रमाणात विकास कामे झाले अजून पर्यंत २-३ वर्षांपासून निधी उपलब्ध होत नाही असा आरोप करण्यात आला.

गेल्या दोन वर्षांपासून जल जीवन मिशन योजनेअंतर्गत अनेक गावांमध्ये मोठ्या प्रमाणात कामे सुरू आहेत, परंतु अपुऱ्या निधीमुळे कामही अपूर्ण आहे. ग्रामीण रस्ते आणि नाल्यांची अवस्था वाईट आहे. सध्या प्रशासकीय राजवटीमुळे जिल्हा परिषदेतील सर्व योजनांअंतर्गत कामे मंजूर करताना आमदार, खासदार आणि पालकमंत्र्यांचा बराच हस्तक्षेप दिसून येत आहे. त्यांच्या हस्तक्षेपाशिवाय, ग्रामपंचायतीच्या प्रस्तावित मागणीला प्राधान्य द्यावे, अशी मागणी करण्यात आली.

येत्या काही महिन्यांत सरपंच आणि उपसरपंचांचा कार्यकाळ संपत आहे. अशा परिस्थितीत जिल्ह्यातील अनेक सरपंच आणि उपसरपंचांना आजपर्यंत त्यांचे मानधन मिळालेले नाही. सरपंच आणि उपसरपंचांच्या प्रलंबित मानधनाची चौकशी करावी आणि कर्तव्यात निष्काळजीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यावर फेरफार विलंब कायद्यानुसार कारवाई करावी आणि प्रलंबित मानधन लवकर द्यावे अशी मागणी करण्यात आली.

सध्याच्या परिस्थितीत ग्रामीण भागात रस्ते, सार्वजनिक ठिकाणे आणि कुरणांवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे दिसून येत आहेत.

# घुग्घुस शहरात कामगार कर्मचाऱ्याचा अपघात होताच प्रशासनाला आली जाग, ट्राफिक सिंग्नल सुरू

**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घुस, दि. ५ ऑगस्ट :** घुग्घुस येथील नवनिर्माण बसस्थानक, छत्रपती शिवाजी महाराज चौकात कित्येक महिन्यापासून ट्राफिक सिंग्नल बंद होते. कामगार कर्मचाऱ्यांच्या जोरदार अपघात नंतर कुंभकर्णी झोपेत गेलेले प्रशासन जागे झाले, आणि ट्रॅफिक सिग्नल सुरू करण्यात आल्याने प्रशासन सामान्य माणसाच्या जीवावर उठले आहे का..? अशी चर्चा नागरिक करत आहेत.

सदर ठिकाणी सुरू असलेले पुलाचे काम कासव चालीप्रमाणे संथ

**लक्षवेधी**
**पंकज रामटेके**

गतीने सुरू होते. आणि रेल्वे गेट वारंवार बंद राहत असल्याने ये - जा करणाऱ्या सामान्य स्थानिकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत होते. मात्र शासन, प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी कर्तव्याला बगल देऊन कुंभकर्णी झोप घेत होते. राजकारणी नेते थातूरमातूर निवेदन देऊन स्वतःला मिरवत फिरत होते. मात्र सदर ठिकाणा वरील गंभीर जीवघेण्या समस्येकडे कोणीही जाणिवेने लक्ष दिले नाही, अखेर दोन निष्पाप कामगार कर्मचाऱ्यांचा पायाच्या चेंदाबेदा झाला नंतर प्रशासनाला जाग आली आणि सिग्नल सुरू करण्यात आल्याचे नागरिकांत बोलल्या जात आहे.

राजकारणी नेत्यांकडून स्वतःला मिरवत छोटे कार्यक्रम आयोजित केले. पण ट्राफिक सिंग्नल बंद का!त्याच्याकडे कधी लक्ष दिले गेले नाही. फक्त राजकारण करीत राहणार येवढेच शहरात अनेक वर्षांपासून चालु आहे.

काही दिवसा पूर्वी ३० जुलै बुधवार रोजी रात्री ९:२० वाजता बसस्थानक, छत्रपती शिवाजी महाराज चौकाच्या परिसरात दोन कामगार कर्मचाऱ्यांच्या अपघात होताच वाहतूक सिग्नल सुरू झाले. अपघात झाल्यावरच का शासन, प्रशासनला जाग आली! शहरात मंत्री आल्यावरच रस्त्यावरचे गड्डे थातूरमातूर का बुजवतात..? असे एक ना अनेक प्रश्न सामान्य नागरिकांच्या मनात 'आ' वासून उभ्या आहेत

समोर आता शहरातील पहिल्यांदाच नगरपरिषद निवडणूक येत असल्याने छोटे, मोठे, जेष्ठ, सामाजिक नेते जागे झाले आणि थातूरमातूर आंदोलन, निवेदन करीत आहेत अशीही नागरिकांत चांगलीच चर्चा रंगली. समोर येत असलेल्या आगामी नगरपरिषद निवडणूकीत आजी, माजी नेत्यांना चांगलाच निवडणूकीचा फटका बसेल असे चित्र दिसत आहेत. नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहेत की, किती दिवस ट्राफिक सिग्नल सुरू राहणार व आणि राजकीय नेते, शासन, प्रशासन जडवाहतूकीला मात देणार आणि अपघात होणार नाही याची गंभीरतेने दखल घेतली जाणार असेही नागरिकांकडून बोलण्यात येत आहे.

# १० ला राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळावा

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ५ ऑगस्ट :** सहयोग कल्याणकारी बहुजन संस्था नागपूर संचालित बौद्ध मंगल परिणय ग्रुप नागपूर रविवार, १० ऑगस्ट रोजी सकाळी १२ ते दुपारी ४ या वेळेत चंद्रपूर शहरात वरोरा नाका येथील श्रमिक पत्रकार भवन चंद्रपूर येथे राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळावा आयोजित करणार असल्याची माहीती एड. पुष्पा ढाबळे ने पत्रपरिषदेत दीली.

बौद्ध मंगल परिणय ग्रुप गेल्या साडेचार वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात काम करत आहे. विदर्भातील विविध जिल्ह्यांमध्ये या ग्रुपद्वारे विविध



सामाजिक कामे केली जात आहेत. आणि त्यांना बहुतेक प्रमाणात यश मिळाले आहे. यावेळी चंद्रपूर शहरात प्रथमच या ग्रुपद्वारे राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळावा आयोजित करण्यात आला आहे. नागपूर येथील सहयोग कल्याणकारी बहुजन संस्थेचे मुख्य संयोजक नरेश गायकवाड, दयाराम गावंडे, ॲड. पुष्पा ढाबरे, प्रमोद सोमकुवर हे आयोजित कार्यक्रमात उपस्थित राहणार आहेत.

आतापर्यंत या ग्रुप ने २५ जोडप्यांच्या यशस्वी विवाहांची माहिती दिली आहे. सध्या संपूर्ण विदर्भातून १५० ते २०० तरुण-तरुणींची नावे नोंदणीकृत झाल्याची माहिती देण्यात आली आहे. २० ते २५ नावे चंद्रपूरची असल्याची माहिती देण्यात आली आहे. मेळाव्यात नाममात्र योगदान रक्कम घेतली जाईल अशी माहिती देण्यात आली आहे. पत्रकार परिषदेत ॲड. पुष्पा ढाबरे आणि प्रमोद सोमकुवर उपस्थित होते.

# ऱ्हास पावलेल्या कलांना नविन रंगमंच देऊ - शंकरराव रामटेके

### उमंग कला महोत्सव व कलाकार सोहळयाचे १० ऑगष्टला आयोजन

**महासागर प्रतिनिधी**

**नेरी, दि. ५ ऑगस्ट :** विदर्भातील तसेच ग्रामीण भागातील अनेक कलाकारांमध्ये कला गूण भरून आहेत. पण आजच्या घडीला त्यांना वाव मिळत नाही. अश्याच कलेंना शासन दरबारी व जनतेत जागृतता घडवण्यासाठी विदर्भ शाहिर कलाकार परिषद कन्हान ( नागपूर) तर्फे १०ऑगष्ट २०२५ रोजी उमंग कलामहोत्सव व सत्कार सोहळा आयोजीत केला असून चंद्रपूर जिल्हातील कलाकारांना होणाऱ्या महोत्सवाला उपस्थित राहण्याचे आवाहन विदर्भ शाहिर कलाकार परिषदेचे अध्यक्ष शंकरराव रामटेके यांनी केले आहे.

ग्रामिण भागात प्रामुख्याने दंडार, गोंधळ, खडी गंमत, पोवाडा, डाहका, भजन, कीर्तन, रोवण्यातील गाणी अश्या अनेक पूर्वीच्या कला आढळून येतात पण आजच्या काळात त्यांचा ऱ्हास होत आहे. त्या कलेंना जिवंत ठेवण्यासाठी विदर्भ शाहिर कलाकार परिषद रंगमंच उपलब्ध व शासणाच्या मिळणाऱ्या मानधन व त्यासाठी करणारी खटपट या सर्व गोष्टीवर प्रात्यक्षिक माहिती अश्या कलाकारांना महोत्सवातून दरवर्षी देत आहे.

याचाच फायदा व आपल्या कलांगूणांना जनतेच्या नजरेत आणून देण्यासाठी चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व कलांकारांनी होणाऱ्या महोत्सात सहभाग नोंदवावा असे आवाहन विदर्भ शाहिर कलाकार परिषद कन्हान (नागपूर) तर्फे चंद्रपूर जिल्हा अध्यक्ष शंकरराव रामटेके यांनी केले आहे.

> जिल्हातील अनेक कलाकारांच्या मानधन फाईल त्रुटीमध्ये जाण्याचे कारण म्हणजेच की शासनाने वेळोवळी घेतलेल्या निर्णयाबाबत माहिती नसणे. या करीता विदर्भ शाहीर कलाकार परिषद अश्या महोत्सवाचे आयोजन करीत असते त्याचा लाभ विदर्भातील व चंद्रपूर जिल्हातील कलाकारांनी घ्यावे. महोत्सवात सहभागी होण्याकरिता कलाकारांनी थेट संपर्क करावे.
>
> **शंकरराव रामटेके चंद्रपूर जिल्हा अध्यक्ष, विदर्भ शाहीर कलाकार परिषद कन्हान**

# नागभिड तहसील कार्यालयात महसूल सप्ताह दरम्यान विविध उपक्रमाची अंमलबजावणी

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**नागभीड, दि. ५ऑगस्ट :** महाराष्ट्र सरकारने १ऑगस्ट ते ७ऑगस्ट कालावधीत महसूल सप्ताह साजरा करण्यात येत असून मा .जिल्हाधिकारी, उप विभागीय अधिकारी यांचे अंतर्गत तहसीलदार यांनी तालुक्यात विविध उपक्रमाची सुरुवात ऑगस्ट दिनी केली आहे.

१ऑगस्ट रोजी महसूल दिनाची सुरुवात विविध प्रमाणपत्राचे व कार्यालयातील अधिकारी,कर्मचारी यांना पुरस्कार वितरण करण्यात आले २ऑगस्ट रोजी तालुक्यातील सावरगाव व मजली येथील घरकुल लाभार्थ्यांना अतिक्रमण जागेचेमान्यावरचे हस्ते पट्टे वाटप करण्यात आले, ३ऑगस्ट रोजी मंडळातील पाचही ठिकाणी वृक्ष लागवड करून पांदण रस्त्याचे अतिक्रमण आणि



झाडे लावण्यात आली.४ऑगस्ट रोजी मंडळातील ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाची अंमलबजावणी जात, उत्पन्न व शैक्षणिक प्रवेशकरीता आवश्यक असलेले दाखले देण्यात आले.५ऑगस्ट रोजी तालुक्यातील विशेष सहाय्य योजनेतील डी बी टी, न झालेल्या लाभार्थ्यांची घर भेट देऊन डी बी टी करून घेणे ६ऑगस्ट रोजी तालुक्यातील बोथली व लखमापूर येथील १७प्रकरणातील जागा शर्तभंग नियमकुल जागा सरकार जमा करण्यासाठी कार्यवाही करण्यात येईल आणि ७ऑगस्ट रोजी m sand वाळू धोरणाची कशी अंमलबजावणी करावी आणि महसूल सप्ताहाची सांगता होणार असल्याचे एका प्रसिद्धी पत्रक देऊन सांगितले आहे.

# महाराजस्व समाधान शिबिरात एक हजार लाभार्थ्यांनी घेतला लाभ



**महासागर तालुका प्रतिनिधी**

**पोंभूर्णा, दि. ५ ऑगस्ट :** महसूल सप्ताह उपक्रम अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान अंतर्गत पोंभूर्णा तहसील कार्यालयाच्या सभागृहात दि.४ ऑगस्ट ला शिबिराचे आयोजन करण्यात आले.या शिबिरात एक हजार लोकांनी शिबीराचा लाभ घेतला.

या शिबिरामध्ये संजय गांधी निराधार योजना,अन्न पुरवठा विअभाग, कृषी विभाग,इश किसान सन्मान निधी अअ,पिक विमाअ योजना,आधार कार्ड अपडेट,आरोग्य विभाग,भुमी अभिलेख विभाग,पोस्ट विभाग,मतदार नोंदणी,महसूल विअभागाचे स्टॉल लावण्यात आले होते.यावेळी लाभार्थ्यांनी संजय गांधी निराधार योजनेची डिबीटी नोंदणी, इश्वअ‍ खाते उघडणे,रहिवाशी, उत्पन्न,जाती,नॉन क्रिमिलेअर, वारसान प्रमाणपत्राचा लाभ,जिवंत सातबारा,?आधार बायोमेट्रिक अपडेट,जुन्या गावठाणातील घरांचे पट्टे वाटप,आरोग्य तपासणी शिबिरचा लाभ दिड हजाराहून अधिक लाभार्थ्यांनी घेतला.यावेळी दिव्यांगांना मिळणारे लाभ व दाखल्यांचे काम करण्यात आले.

यावेळी तहसीलदार मोहनिश शेलवटकर,नायाब तहसीलदार रामकृष्ण उईके,दिपाली आत्राम व अन्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# आगामी मनपा जि.प., पंचायत समिती, ग्रामपंचायत निवडणुकीत मनसे कार्यकर्त्यांनी ताकदीने लढावे

### मनसे जिल्हाध्यक्ष मनदिप रोडे, मनसेत युवकांचा प्रवेश

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ५ ऑगस्ट :** - महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे चंद्रपूर जिल्हाध्यक्ष मनदिप रोडे यांच्या नेतृत्वात मनसे अध्यक्ष राजसाहेब ठाकरे यांच्या मराठी माणसांच्या कल्याणासाठी केलेल्या कामावर प्रभावित होऊन चंद्रपूर जिल्ह्यातील शेकडो युवक मनसेत प्रवेश करीत आहे. नुकतेच शिवगड येथील कार्यालयात मनसे जिल्हाध्यक्ष मनदिप रोडे यांच्या नेतृत्वात युवकांनी मनसेत पक्ष प्रवेश घेतला.

युवकांचे प्रश्न, समस्या



सोडविण्यासाठी मनसे जिल्हाध्यक्ष मनदिप रोडे नेहमी पुढाकार घेत असतात.

युवकांचे शिक्षणांचे प्रश्न, रोजगारांचे प्रश्न मांडत असतात. यामुळे जिल्ह्यातील युवक मनसे पक्षाकडे आकर्षित होत आहे. सत्ताधारी राजकीय पक्षांच्या धोरणामुळे युवक निराश झाले आहे. त्यामुळे त्यांना आता एकच मनसे सारखा आक्रमक राजकारण करणारा पक्ष आवडत आहे.

यावेळी मनसे जिल्हाध्यक्ष मनदिप रोडे म्हणाले, महानगर पालिका - जिल्हापरिषद - पंचायत समिति - ग्रामपंचायत सरपंच या सर्व निवडणूकन लढा आणि तुमच्या मधूनच लोक प्रतिनिधि बनले पाहिजे अस आवाहन मनसे जिल्हाध्यक्ष मनदिप रोडे यांनी केले.युवक युवतीच्या प्रतेक रोजगार मिळाला पाहिजे या करिता मी नेहमी अग्रसेन राहिल. पक्षात येणाऱ्या युवा वर्गाला मनसे पक्ष निराश करणार नाही. त्यांना योग्य नेतृत्व देणार. युवकांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला जाणार असा विश्वास मनसे जिल्हाध्यक्ष मनदिप रोडे यांनी दिला.

यावेळी मनसे शहर उपाध्यक्ष बाळा चंदनवार, राजुरा तालुका अध्यक्ष आदित्य भाके, बल्लारपुर तालुका अध्यक्ष गोपाल मोहुर्ले, बल्लारपूर महिला सेना शहर अध्यक्ष अरुणा ताई तोडसाम , कोरपना तालुका अध्यक्ष शालू ताई वांढरे, राजुरा महिला सेना शहर अध्यक्ष भावना ताई शेंडे ,वाहतुक सेना शहर अध्यक्ष असलम खान , संजय भडके जिल्हा उपाध्यक्ष , अंकुश कोडे जिल्हा सचिव ,

आसिफ कुरेश उपजिल्हा संघटक , बरकात पठाण शाखा उपाध्यक्ष, बंडू पेंडाम शाखा उपाध्यक्ष , वसीम शेख, राम सारवा, प्रवीण उके, संजय सातव, जोतिष सोनेकर, बादल कंडे, दीपक आदे, अरबाज खान, स्वप्नील आरडे, प्राशिक शेंडे , शुभम टीगलवार तसेच समस्त मनसे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# गणेशोत्सव विविध परवानगीसाठी एक खिडकी प्रणाली

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ५ ऑगस्ट :** चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे गणेशोत्सवा प्रसंगी सार्वजनीक गणेश मंडळांना लागणाऱ्या विविध परवानग्या या एकाच ठिकाणाहुन मिळाव्या यासाठी एक खिडकी प्रणाली सुरु करण्यात आली असुन मनपा मुख्य इमारत येथे गणेश मंडळांसाठी मदतकक्षसुद्धा सुरु करण्यात आला आहे. येत्या २७ ऑगस्टपासुन शहरात दहा दिवस गणेशोत्सव साजरा होणार आहे. गणेश मंडळांना महापालिका व इतर विभागाकडून रीतसर परवानग्या या घ्याव्या लागतात. पोलीस स्टेशन, ट्राफिक पोलीस स्टेशन,सार्वजनिक बांधकाम, अग्निशमन, महावितरण केंद्र, महानगरपालिका इत्यादी विभागाच्या परवानगी या एकच ठिकाणाहुन घेता याव्या यासाठी एक खिडकी प्रणाली चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे सुरु करण्यात आली आहे.

**नमुना बारा (आदेशपत्र)**

**(प्रकरण ३, परिच्छेद ७ पहा)**

**कोर्ट विद्यमान, तालुका दंडाधिकारी, नागभीड यांचे न्यायालय**

रा.मा.क्र. /MRC-८१/२०२४-२०२५ मौजा- मोहाळी (मो.) तह.नागभीड

**अर्जदार श्री. भाऊराव सदाशिव वाघ रा.मोहळी (मो)** ता. नागभीड कडून सूचित करण्यात येते की अर्जदाराचे मुलगी (१) **कु. शालिनी भाऊराव वाघ** (जन्मतारीख (२२.१०.१९८८ ) नं.(२) **कु. किरण भाऊराव वाघ** (जन्मतारीख (८.७.१९९४) व नं.(३) **पल्लवी भाऊराव वाघ** जन्मतारीख (३०.१०.१९९९)वरील तिन्हीं मुलीचा जन्म मौजा मोहाळी (मो) ता. नागभिड, जिल्हा चंद्रपूर येथे झाला असून अर्जदारांनी मुलीचे जन्म प्रमाणपत्र मिळण्याकरिता तहसिलदार साहेब नागभिड यांचेकडे अर्ज सादर केला असून कोणाचेही आक्षेप, हरकती असल्यास जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसाचं आत आक्षेप,हरकती नोंदवावी.

**स्वा.**
**तहसीलदार, नागभीड**

RNI No.49746/1988 चंद्रपूर महासागर

मालक, मुद्रक, प्रकाशक सौ. निर्मला चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापुन दैनिक चंद्रपूर महासागर कार्यालय, पोपट बिल्डींग जटपुरा गेट, चंद्रपूर येथे प्रकाशित केले. संपादक राहुल चांडक

मुख्य कार्यालय फोन - ७४४७७३९८५१, ९९२२९७००२३ * स्थानिक संपादक :- प्रवीण बतकी * (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

